cmyk




# पारनेर दर्शन




वर्ष ३ , अंक ७३, शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर तालुक्यात धुमाकूळ घालणारे दरोडेखोर निष्पन्न

## एलसीबीने दोघांच्या मुसक्या आवळल्या

## पारनेरसह, श्रीगोंदे, नगर एमआयडीसीत दरोडे

पारनेर : प्रतिनिधी

पारनेर शहर, तालुका तसेच नगर एमआयडीसी व श्रीगोंदे तालुक्यात धुमाकूळ घालून नागरीकांवर दहशत निर्माण करणारी दरोडेखोरांची टोळी निष्पन्न झाली असून त्यांच्यापैकी दोघांच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले होते. ताब्यात घेण्यात आलेल्या दोघा दरोडेखोरांना पारनेर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असून पारनेर पोलीस इतर दरोडेखोरांचा कसा शोध घेतात याची उत्सुकता आहे.

दरोडे टाकून मारहाण व लाखोंचा मुद्देमाल लुटून नेणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीतील दोघांना ताब्यात घेतानाच त्यांच्याकडून एक लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या दोघा आरोपींकडून विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सहा ठिकाणी केलेल्या गुन्हयांची उकल झाली आहे.

सिध्देश सादीश काळे वय २२ रा. वाळुंज पारगांव, जि. नगर, श्रीहरी हरदास चव्हाण वडगांव गुप्ता जि. नगर या दोघांना नगर तालुक्यातून एलसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले. या दोघांकडे पोलीस पथकाने अधिक चौकशी केली असता त्यांनी पारनेर, सुपा, बेलवंडी, एमआयडीसी पोलीस ठाण्यांच्या हददींमध्ये सहा ठिकाणी चोऱ्या केल्याची कबुली दिली. तसेच चोरी केलेल्या सोन्याचे दागिने काजल अजय भोसले रा. वाळुंज हिने विक्री केल्याचे तपासात पुढे आले आहे.

### ही आहे दरोडेखोरांची टोळी !

सिध्देश सादीश काळे, अजय सादीश काळे, धीरज सादीश काळे सर्व रा. वाळुंज पारगांव ता. नगर, नागेश विक्रम भोसले रा. घोसपुरी ता. नगर, गणेश सुरेश भोसले रा. पारगांव ता. आष्टी जि. बीड, बाळू झारू भोसले रा. पिंपरीजलसेन ता. पारनेर, पवन भोसले रा. पढेगांव ता. कोपरगांव, सुभाष भोसले रा. पारनेर, श्रीहरी हरदास चव्हाण रा.वडगांव गुप्ता.


पारनेर तालुक्यात धुमाकूळ घालणाऱ्या दरोडेखोरांची टोळी निष्पन्न करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांना जेरबंद केले.

### पारनेर परिसरात दरोडयाच्या तयारीत असताना जेरबंद

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्हयातील जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना आदेश दिले होते. आदेशानुसार गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या माहीतीनुसार पारनेर परिसरात दरोडयाच्या तयारीत असलेल्या टोळीबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. गुन्हे शोध पथकाने सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात, अंमलदार फुरकान शेख, रवींद्र घुंगासे, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, आकाश काळे, अमोल कोतकर, मेघराज कोल्हे व महादेव भांड यांच्या पथकाने केली.

# सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती मिळवून देणार

अहिल्यानगर : प्रतिनिधी

अहिल्यानगर महानगर पालिकेमधील सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्तया देण्यासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांना पत्र पाठवून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासननिर्णयाकडे लक्ष वेधून सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्याची मागणी केली आहे. दरम्यान अहिल्यानगर महापालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती मिळवून देवू अशी ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली आहे.

खा. लंके यांनी पाठविलेल्या पत्रात नमुद केले आहे की, सफाई कामगारांच्या प्रश्नावर दि.२९ जानेवारी २०२५ रोजी अहिल्यानगर महापालिकेमध्ये झालेल्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने या प्रश्नासंदर्भात नगरविकास विभागाकडे मार्गदर्शक प्रस्ताव पाठविला असून त्याअनुषंगाने नगर विकास विभागाकडून आलेल्या पत्रांसंदर्भात वेळोवेळी खुलासाही सादर करण्यात आलेला असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे.



### खासदार नीलेश लंके यांची ग्वाही ; अहिल्यानगर महापालिका सफाई कामगारांचा प्रश्न

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या १३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ मधील तरतुदीनुसार त्वरीत कार्यावाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. महानगरपालिकेमध्ये या प्रश्नावर झालेल्या बैठकीदरम्यान ही बाब आपण नगर विकास विभाग-२५ चे प्रधान सचिव यांच्याशी दुरध्वनीवर चर्चा करताना निदर्शनास आणून दिलेली आहे. या चर्चे दरम्यान प्रधान सचिवांकडून या प्रश्नावर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे खा. लंके यांनी या पत्राच्या माध्यमातून निदर्शनास आणून दिले आहे.

संबंधित ३०५ व ५०६ कोर्ट केसेसमध्ये सफाई कर्मचारी आयोग येऊन ३९५०/२३ नुसार पिटीशन दाखल आहे. हा संपूर्ण महाराष्ट्रातील सफाई कामगारांचा विषय असून ३०५ व ५११ कर्मचाऱ्यांच्या अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सन १९९९ मध्ये नियुक्या कायम करण्यात आल्या. शासनाने विशेष बाब म्हणून नियुक्या दिल्या, त्यांना लाड-पागे समितीच्या शिफारसी लागू होणार नाहीत. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर ती पदे व्यपगत होती असा शासन निर्णय पारित करण्यात आला होता. मात्र त्यानंतर दि.२४ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील उर्वरित पान ३ वर

# बिबट्या माणसांना मारू शकतो, मात्र बिबट्याला मारण्याची परवानगी नाही ?

### डॉ.सुजय विखे यांचा सवाल जनहित याचिका दाखल करणार

नगर : प्रतिनिधी

राज्यभरात बिबट्याच्या हल्ल्यात पशुधनासोबतच मानवावर हल्ल्याच्या घटना वाढत आहेत. गेल्या काही दिवसात बिबट्यांचा मानवी वस्तीतील वावर वाढला आहे. त्यामुळे अनेक निष्पाप बालकांचा देखील मृत्यू झाला आहे. याबाबत आपण न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याची माहिती भाजपचे माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी दिली आहे. बिबट्या माणसांना मारू शकतो, मात्र बिबट्याला मारण्याची परवानगी माणसाला नाही ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. यासाठी आपण ही जनहित याचिका दाखल करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या संदर्भात आपण वन विभागाकडून माहिती घेतली असून त्यावर अभ्यास सुरू असल्याचे सुजय विखे पाटील यांनी सांगितले आहे. या संदर्भात वकिलांचा सल्ला घेऊन लवकरच न्यायालयात जाणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. संगमनेर आणि राहता तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात अनेकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे आपण वन विभागाकडून ही सर्व माहिती घेत असून यावर अभ्यास आता पूर्ण होत आला असल्याचे त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



साई भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी संस्थांच्या वतीने अन्नछत्राच्या माध्यमातून मोफत जेवण दिले जाते. मात्र आता त्यासाठी कूपन बंधनकारक करण्यात आले आहे. कूपन असेल तरच भाविकांना प्रसादाचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे आता साई भक्तांचा उर्वरित पान ३ वर

# ६ खासदार ठाकरेंची साथ सोडणार ?

## लवकरच शिंदे गटात पक्षप्रवेश करणार ; ऑपरेशन टायगरची तयारी पूर्ण

मुंबई : प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रातील राजकारण पुन्हा एका मोठ्या प्रमाणात चर्चेत असलेले दिसत आहे. विधानसभेच्या निवडणुकीत निराशा आल्यामुळे ठाकरे गटातील तसेच महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये कमालीची अस्वस्थता बघायला मिळत आहे. त्यामुळे आता विरोधी पक्षातील अनेक आमदार व खासदार पक्षबदलाचा विचार करताना दिसत आहेत. त्यामुळे आता महाराष्ट्रात पुन्हा एकदा पक्ष फुटणार असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, राज्यात पुन्हा एकदा शिवसेना उर्वरित पान ३ वर



### ऑपरेशन टायगरवर संजय राऊत काय म्हणाले ?

ऑपरेशन टायगर होईल, ऑपरेशन कमळ होईल. मात्र आधीच ऑपरेशन रेड्याची शिंग झालेले आहे. ते अशा काहीही अफवा पसरवत आहेत. कालच आम्ही आमच्या संसदेतील कार्यालयाचे उद्घाटन केलं. आमचे सगळे खासदार उपस्थित होते ते आकडा चुकीचा सांगत आहेत. त्यांनी पैकीच्या पैकी खासदारांचा आकडा धरला पाहिजे. ते कोणत्या गुंगीत आहेत हे त्यांनी समजून घेतलं पाहिजे. त्यांनी स्वत:ची वैद्यकीय तपासणी पूर्ण केली पाहिजे. यासोबतच ते पुढे म्हणाले की, कसलं उर्वरित पान ३ वर

# शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हा

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश



मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील सर्वच शिव पाणंद आणि शेत रस्त्यांची हद्द निश्चित करून रस्त्यांची कामे दर्जेदाररित्या पूर्ण करा. तसेच शेत रस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाला दिले आहेत. तसेच दर्जेदार रस्त्यांसाठी नागपूर पॅटर्न अमलात आणण्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

शिव पाणंद आणि शेत रस्ते समृद्ध करण्याबाबत पब्लिक डोमेनच्या माध्यमातून नागरिकांच्या सूचना मागविण्यात आल्या होत्या. महसूल उर्वरित पान ३ वर

# मी तोंड उघडले तर पंकजा मुंडेंचे मंत्रिपद जाईल !

## करुणा शर्मा - मुंडे यांचा इशारा ; धनंजय मुंडे यांच्याकडे आकांची कमी नसल्याचा दावा

बीड : प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे तो कुठे आहे त्याचं काय झालं याची काहीच माहिती समोर येत नाही. ५० दिवसांहून अधिक काळ लोटला तरी कृष्णा आंधळेचा पत्ता लागत नाही, त्याची हत्या झाली असावी असा दावा करुणा मुंडे यांनी केला आहे.

करुणा मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेचा दोन महिने झाले तरी तपास लागत नाही. त्याला ठार मारले असेल असा दावा त्यांनी केला आहे. तर धनंजय मुंडे यांच्यासंदर्भात माझ्याकडे बरेच काही




बोलण्यासारखे आहे. त्यांच्याकडे आकाची कमी नाही म्हणतानाच त्यांच्या आर्थिक गडबडीची माहिती योग्य वेळ आली की बाहेर काढणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.


**धनंजय मुंडे स्वत:ला माफ करु शकतील ?**

करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडेंची सवय आहे की, फुट उर्वरित पान ३ वर










cmyk

## निरोगी आरोग्याचा कानमंत्र
# निरामय

# छोटासा मोबाईल करतोय आरोग्याची मोठी हानी!

**आज देशातील मोबाईल युजरच्या संख्येने १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे आणि स्मार्टफोन आपल्या जीवनाचा एक मोठा भाग बनला आहे. आपण अन्नाशिवाय काही काळ जगू शकतो पण मोबाईल आणि इंटरनेटशिवाय जगणे कठीण आहे अशी परिस्थिती जणू निर्माण झाली आहे. पण या मोबाईलचे आपल्या आरोग्यासाठी काही तोटेही आहेत. स्मार्टफोनचे अनेक प्रकारे फायदे आहेत पण त्यांचे अनेक तोटेही आहेत. मोबाईलची सर्वात मोठी समस्या म्हणजे रेडिएशन. हे आरोग्यासाठी विषापेक्षा कमी नाही. आजच्या रिपोर्टमध्ये आम्ही तुम्हाला मोबाईल रेडिएशन आणि टॉवर रेडिएशनचे आरोग्यावर होणारे परिणाम आणि ते कसे तपासावे याबद्दल सांगणार आहोत...**



### मोबाईलचे रेडिएशन किती असावे ?

दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या विशिष्ट अवशोषण दर (SAR) नुसार, कोणत्याही स्मार्टफोन, टॅबलेट किंवा इतर स्मार्ट उपकरणांचे रेडिएशन १.६ वॅट्स प्रति किलोग्रामपेक्षा जास्त नसावे. हा नियम शरीरापासून डिव्हाइसच्या १० मिलीमीटरच्या अंतरावर देखील लागू होतो. फोनवर बोलताना किंवा खिशात ठेवताना तुमचे डिव्हाइस रेडिएशनची ही मर्यादा ओलांडत असेल तर ते तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे. फोनचे ड्रॉ व्हॅल्यू १.६ वॅट्स प्रति किलोग्राम (१.६ W/kg) पेक्षा जास्त असल्यास, तुमचा फोन त्वरित बदला.

मोबाईल टॉवर रेडिएशन म्हणजे काय? : कोणत्याही उपकरणाला एकमेकांशी जोडण्यासाठी नेटवर्कची आवश्यकता असते. मोबाईल फोनचेही तसेच आहे. मोबाईल फोन नेटवर्कसाठी दूरसंचार कंपन्या वेगवेगळ्या भागात आवश्यकतेनुसार टॉवर बसवतात. नेटवर्कच्या बाबतीत, रेडिएशनचे दोन प्रकार आहेत. पहिले टॉवरमधून निघणारे रेडिएशन आणि दुसरे म्हणजे मोबाईलमधून निघणारे रेडिएशन.

मोबाईल रेडिएशनचे दूरागामी परिणाम : आपण टॉवरचे रेडिएशन स्वतः तपासू शकत नाही, परंतु आपण ते आपल्या फोनद्वारे तपासू शकतो. टॉवरच्या रेडिएशनचा आपल्याशी थेट संपर्क होत नाही. त्यामुळे त्याचा शरीरावर होणारा विपरित परिणाम फारच कमी होतो. पण फोन २४ तास आपल्यासोबत राहिला तर त्याचा परिणाम खूप जास्त असतो.

- मानसिक नैराश्यासह अनेक जीवघेणे आजार : आपण वापरत असलेले मोबाईल फोन एका विशिष्ट प्रकारच्या लहरी (विद्युत चुंबकीय विकिरण) उत्सर्जित करतात. ज्या सामान्य जीवनासाठी हानीकारक मानल्या जातात. मोबाईल रेडिएशनमुळे मानसिक नैराश्यासह अनेक जीवघेणे आजार होण्याची शक्यता आहे. मोबाईल रेडिएशनमुळे मेंदूचा कर्करोग, एकाग्रता, डोळ्यांच्या समस्या, वाढता ताण, जन्मजात धोका, न्यूरोडीजनरेटिव्ह विकार, हृदयाचा धोका, प्रजनन क्षमता आणि ऐकण्याच्या समस्या होऊ शकतात. AIIMS आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) च्या अभ्यासात दावा करण्यात आला आहे की मोबाईल रेडिएशनमुळे व्यक्ती बहिरी होऊ शकते आणि नपुंसक बनण्याची शक्यता देखील आहे.
- *#07# डायल करून तपास मोबाईलचे रेडिएशन : जर तुम्हाला तुमच्या मोबाईलचे रेडिएशन तपासायचे असेल तर त्यासाठी तुम्हाला मोबाईलवरून *#07# डायल करावे लागेल. हा नंबर डायल करताच मोबाइल स्क्रीनवर रेडिएशनशी संबंधित माहिती दिसेल. यात रेडिएशनची पातळी दोन प्रकारे दाखवली जाते. एक म्हणजे 'डोके' आणि दुसरे 'शरीर'. डोके म्हणजे फोनवर बोलत असताना मोबाईलच्या रेडिएशनची पातळी काय असते आणि शरीर म्हणजे फोन वापरताना किंवा खिशात ठेवताना शरीरावर रेडिएशनची पातळी किती असते हे दर्शवते.




अरे, ती बातमी वाचली का कँडी क्रश खेळल्यानं अंगठ्याचं ऑपरेशन झाल्याची..., हो रे, वेडा होता तो, एवढा वेळ काय खेळत होता?, अशी चर्चा सध्या व्हॉट्सअॅप कट्ट्यांवर रंगली आहे. मोबाइलच्या अतिवापराचं एक प्रकरण अमेरिकेमध्ये समोर आल्यानंतर यावर खूप बोललं जातंय. एखादं व्यसन असल्याप्रमाणे मोबाइलचा वापर केल्यानं काही ना काही व्याधी-विकार जडण्याचं प्रमाण आपल्याकडेही दिसून येऊ लागलं आहे.

### स्मार्टफोन थम्ब

फेसबुक लाईकपासून ते मेसेज टाइप करणे, गेम्स खेळणे, फोटो पाहणे यासारख्या सर्वच गोष्टींसाठी अंगठ्याचा सर्वाधिक वापर होतो. त्यामुळे दिवसभर सरासर फिरणाऱ्या अंगठ्याच्या हाडाला कायमची इजा होणे, अंगठाच्या टोकावरील संवेदना नष्ट होण्यासारखे आजार मोबाईलच्या वापरामुळे होतात.

- लक्षणे : अंगठ्याला कसलाच भास न होणे, अंगठ्याच्या बुडाशी (जिथे तो तळहाताला जोडला जातो) हाड दुखणे, अंगठा वाकवताना त्रास होणे, अंगठ्याची पेरे दुखणे.
- सतर्कता : कमीत कमी चॅटिंग करा, जास्त बोलायचे असल्यास थेट फोन करा. सतत एकाच हाताने टायपिंग करणं टाळा.

### याही अडचणी...



सतत फोनची स्क्रीन पाहिल्याने डोळ्यांमधील ओलावा कमी होणे, सतत गाणी ऐकल्याने कानांवर परिणाम होणे, डोके दुखणे यासारखे आजारही फोनच्या अती वापरामुळेच होतात. फोनमुळे अनेकांच्या रिलेशनशिपमध्ये अडचणी येतात. तसेच फोनशी संबंधीत मानसिक आजारही काळजीचाच विषय आहे. त्यामुळे फोन वापरताना मर्यादा निश्चीत करणे गरजेचे आहे.

### सेल फोन एल्बो

या आजारामध्ये फोनवर बोलताना किंवा चालताना चॅटिंग करताना बऱ्याच वेळ हात एकाच स्थितीत ठेवल्याने हातामधील स्थायूंच्या संवेदना क्षीण होतात. या आजाराच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असून यात तरुणांची संख्या मोठी आहे.

- लक्षणे : कोपर दुखणे, फोन वापरताना हाताला मुंग्या येणे, सतत क्रॅम्प येणे.
- सतर्कता : जास्त वेळ फोनवर बोलताना कॉर्ड्स वापरा, तासन्तास चॅटिंग टाळा.

### टेक्स क्लॉ

फोनच्या वजनामुळे किंवा सतत फोन तळहातावर ठेवल्याने मनगट तसेच तळहात दुखावला जातो. वेळीच लक्ष न दिल्यास हा आजार तळहाताला कायमचा निकामी बनवू शकतो.

- लक्षणे : मनगट जड वाटणे, बोटांना अचानक मुंग्या येणे, तळहात जड वाटणे तसेच तळहात हलवताना त्रास होणे.
- सतर्कता : सतत फोन वापरू नका, दोन्ही हातांनी फोन वापरा.

### टेक्स्ट नेक

सतत काय मोबाईलमध्ये डोकावत असतो, या प्रश्नाला ठोस उत्तर नाहीये. मात्र सतत मोबाईलमध्ये डोकं घालून बसल्याने मान तसेच मणक्याला कायमची इजा होऊ शकते.


- लक्षणे : मान दुखणे, पाठीला त्रास होणे.
- सतर्कता : कान आणि खांद्याच्यामध्ये फोन पकडून बोलणे टाळा. आडवे पडून मेसेज करणे टाळा, चालताना चॅटिंग करू नका.

# तुमचं बाळही जेवताना मोबाइलवर खेळतं गेम?

**आपल्या बाळाच्या हातात मोबाइल फोन दिल्यानंतर त्याच्या पोटात अन्नाचे दोन खास अधिक जातील, असं तुम्हाला वाटत असेल तुम्ही गंभीर चूक करत आहात. मुलांना जेवण भरवताना मोबाइल फोन किंवा व्हिडीओ गेम खेळण्यास का देऊ नये? जाणून घ्या याची माहिती...**

लहान मुलांचं आरोग्य जपण्यासाठी त्यांच्या खाण्या- पिण्याच्या वेळा देखील सांभाळाव्या लागतात. कारण लहान मुलांना वेळच्यावेळी जेवण किंवा पौष्टिक अन्नपदार्थ भरवणं म्हणजे टास्कच असतो. पौष्टिक अन्नपदार्थ खाताना लहान मुले प्रचंड टाळाटाळ करतात. अशा वेळेस आई- वडील गोष्टी ऐकवत किंवा मोबाइल फोन देऊन मुलांना जेवण भरवण्याचा प्रयत्न करतात. मोबाइलवर कार्टून पाहत किंवा गेम खेळत अखेर बाळ जेवू लागतं. आपलं बाळ पोटभर जेवावं यासाठी जेवताना त्याच्या अथवा तिच्या हातात मोबाइल देत असाल तर तुम्हाला वेळीच सावध होण्याची आवश्यकता आहे. कारण बाळाच्या आरोग्यावर वाईट परिणाम होण्यासाठी तुम्हीच कारणीभूत ठरत आहात. मुलांनी मोबाइलवर व्हिडीओ गेम खेळत जेवण जेवल्यास त्यांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात, असं संशोधकांचं म्हणणं आहे.

अभ्यासकांनी रॅपिड व्हिज्युअल इन्फॉर्मेशन प्रोसेसिंग (आरव्हीआयपी) नावाच्या गेमवर संशोधन केलं होते. या गेममध्ये युझरच्या स्मृती आणि एकाग्रतेची चाचणी केली जाते. शिवाय अल्झायमर आणि अटेन्शन डेफिसिट डिसऑर्डर यांसारख्या समस्यांचंही परीक्षण केलं जातं. जेवताना कोणत्याही प्रकारचा गेम खेळल्यानं मुलांचं जेवणावरून लक्ष भरकटते आणि खाण्याची क्षमता कमी होत जते, असं संशोधनकर्त्यांचं म्हणणं आहे. यामुळेच जेवताना लहान मुलांच्या मोबाइल किंवा अन्य कोणतेही गेम देऊ नका. लहान मुलांनी जेवणावर पूर्ण लक्ष केंद्रीत केल्यास त्यांच्या पोटात पौष्टिक घटक जातात, ज्यामुळे त्यांच्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते.



### संशोधकांचं काय आहे म्हणणे ?

लहान मुले जेवत असताना त्यांच्या हातात मोबाइल दिल्यानंतर नेमका काय परिणाम होतो? यावर संशोधकांनी अभ्यास केला आहे. संशोधकांनी एकूण ११९ लहान मुलांचे दोन वेगवेगळ्या पद्धतींनी निरीक्षण केलं. पहिल्या टप्प्यात या सर्व मुलांना जेवताना व्हिडीओ गेम खेळण्यास देण्यात आले. दुसऱ्या प्रकरणात मुलांचं लक्ष वळवण्यासाठी कोणतेही साधन देण्यात आले नव्हते. यात हातात व्हिडीओ गेम दिल्यामुळे मुलांनी कमी जेवण केल्याचं संशोधकांना आढळलं. म्हणजे हातात मोबाइल दिल्यानंतर मुले जास्त जेवतात, असा तुमचा गैरसमज आहे. उलट त्यांच्या जेवण्याच्या क्षमतेवर मोबाइलमुळे परिणाम होत आहे. जर्नल ऑफ न्युट्रिशनमध्ये या संशोधनातील माहिती प्रकाशित करण्यात आली आहे.

### मुलांनी जेवताना व्हिडीओ गेम का खेळू नये ?

मुलांनी जेवताना टाळाटाळ करू नये, म्हणून त्यांच्या हातात मोबाइल देणारे कित्येक आई-वडील तुम्ही आसपास पाहिले असतील. आपलं मुल मोबाइल पाहण्यात गुंतेल आणि त्यांच्या पोटात अधिकचे चार घास जातील, असा प्रत्येक पालकाचा समज असतो. पण जेवताना मुलांच्या हातात मोबाइल देऊन तुम्हीच त्यांच्या जिवाशी खेळत आहात. जेवताना मुलांच्या हातात मोबाइल दिल्यास त्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतात. कारण बाळ मोबाइलवर खेळण्यात व्यस्त होतं आणि त्यांच्या जेवण्याच्या क्षमतेवर दुष्परिणाम होऊन पोटात अन्न कमी जातं. कारण बाळाचं पूर्ण लक्ष मोबाइलमध्ये असते.



### जेवताना गेम खेळल्यानं कसा प्रभाव पडतो ?

कम्प्युटरमध्ये गेम खेळण्याव्यतिरिक्त टीव्ही पाहणे, चॅटिंग करणे आणि ई-मेल करताना एखादा व्यक्ती जेवत असेल तर त्यांच्या पोटात कमी प्रमाणात जेवण जाते. खाण्याऐवजी त्याचं संपूर्ण लक्ष समोर असलेल्या यंत्राकडे खेचले जाते. परिणामी संबंधित व्यक्ती आवश्यकतेपेक्षाही कमी जेवण जेवतो. लहान मुलांच्या बाबतीतही हेच घडते. पण लहान मुलांच्या मेंदूचा विकास होताना कोणतेही अडथळे निर्माण होऊ नये, यासाठी आहारातून पोषक घटकांचा पुरवठा होणे गरजेचं आहे.

# मोबाइल बाजूला घेऊन झोपताय; सायलेंट किलर ठरतील या गोष्टी...

**आपल्यापैकी अनेकजण अगदी रात्री झोपताना डोळे बंद होईपर्यंत फोन जवळ ठेवतात. मग तो फोन झोपताना डोक्याजवळ ठेवला जातो. सकाळी लवकर उठण्यासाठी देखील मोबाइल जवळ ठेवला जातो. यातील सगळ्यात सामान्य गोष्ट आहे की इंटरनेट ब्राऊज करता करता झोपणे. प्रत्येकाची कारण वेगवेगळी असतात पण याचा शरीरावर घातक परिणाम होतो.**

६५ टक्के प्रौढ आणि ९० टक्के किशोरवयीन लोक त्यांच्या फोनवर झोपतात. मात्र असे करणे तुमच्यासाठी किती हानिकारक असू शकते. जर तुम्ही थकल्यासारखे आणि खराब मूडमध्ये उठले तर त्यामागे तुमचा स्मार्टफोनही कारणीभूत आहे. तुम्ही ऐकले असेल की झोपायच्या आधी निळ्या- दिव्याचा स्क्रीन वापरल्याने तुमची झोप खराब होऊ शकते. पण त्यात अजून बरेच काही आहे. तुमचा फोन सायलेंट किलर बनून तुमची तब्येत बिघडवण्याचे काम कसे करत आहे जे तुम्हाला कळणारही नाही.



झोपताना फोन बाजूला घेऊन झोपणे धोकादायक : मोबाईल फोन हानिकारक रेडिएशन बाहेर टाकत असतो. ज्यामुळे तुमच्या मेंदूला हानी पोहोचते. यामुळे तुम्हाला डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि आरोग्याशी संबंधित इतर समस्या येऊ शकतात.

फोनच्या रेडिएशनचे हे देखील तोटे : मोबाइल फोनचे रेडिएशन इरेक्टाइल डिसफंक्शनशी जोडलेले आहे. याव्यतिरिक्त, तुमच्या सेल फोनचा निळा प्रकाश देखील झोपेला प्रेरित करणाऱ्या संप्रेरकाच्या उत्पादनात व्यत्यय आणू शकतो, ज्याला मेलाटोनिन देखील म्हणतात. हे बॉडी क्लॉकमध्ये व्यत्यय आणते. ज्यामुळे झोपणे कठीण होते. त्यामुळे अनेकदा मोबाइल पाहताना आम्हाला झोपच लागत नाही. अशी अनेकांची समस्या असते.

WHO च्या मते : वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने (डब्ल्यूएचओ) मेंदूच्या कर्करोगाचा एक प्रकार असलेल्या ग्लिओमाच्या वाढत्या जोखमीवर आधारित फोनमधून आरएफ रेडिएशनचे वर्गीकरण मानवांसाठी कार्सिनोजेनिक म्हणून केले आहे. त्यामुळे तुमच्या मोबाइलचा थेट संबंध हा मेंदूच्या कर्करोगाशी होत असतो.

- झोपताना किती दूर असावा मोबाइल : तुम्ही फोन ठेवलात तर फोनला जोडलेल्या रेडिओ फ्रिक्वेन्सी इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डची ताकद खूप कमी होते. कोणतेही विशिष्ट अंतर स्केल दिलेले नाही, परंतु गंभीर परिणाम टाळण्यासाठी ते कमीतकमी तीन फूट ठेवण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे रात्री झोपताना फोन उशाशी न घेता लांब ठेवणे बंधनकारक असते.
- झोपताना फोन पाहण्याची सवय अशी मोडा : तुम्ही झोपायला जात असाल तेव्हा फोन बंद करा किंवा सायलेंट वर ठेवा. जर तुम्ही कॉलसाठी उपलब्ध असाल तर तुमचा मोबाईल फोन तुमच्या बेडपासून दूर ठेवा. अलार्मसाठी घड्याळ वापरा. असे लोक आहेत ज्यांना झोपण्यापूर्वी ई-पुस्तके वाचण्याची सवय आहे. त्याने एक पुस्तक हातात घेऊन वाचले पाहिजे. तसेच नामस्मरण करा. रात्री झोप येईलपर्यंत मन आणि मेंदू एका चांगल्या गोष्टीत अडकवून ठेवा.



## शॉर्ट न्यूज

### गुरुजी, ग्रामसेवकांचे पगार रोखले

**नगर :** फेब्रुवारीची पाच तारीख उजाडली तरीही शिक्षक आणि ग्रामसेवकांचे पगार अजुन झालेले नाहीत. संबंधित कर्मचाऱ्यांची ऑफलाईन हजेरी गृहीत न धरता 'क्यू आर' प्रणालीवरील अटेंडन्सीची पडताळणी करूनच पगार काढण्याच्या सूचना सीईओंनी केल्या आहेत. त्यामुळे 'क्यू आर'वर बहिष्कार टाकणाऱ्या गुरुजींसह ग्रामसेवकांना जानेवारीच्या पगारापासून वंचित रहावे लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्रशासनाने पगार रोखल्यामुळे काल रात्री उशीरापर्यंत शिक्षक समन्वय समितीकडून विचारमंथन सुरू होते, या ठिकाणी ग्रामसेवकही उपस्थित होते, अशी माहिती समजली.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**शिर्डी :** टेरेसवरील खोलीमध्ये बसून अभ्यास करणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा फोटो दुसऱ्या मुलासोबत एडिट करून व्हायरल करण्याची धमकी देत तिचा हात धरून तिचा विनयभंग केल्याची घटना शहरांमध्ये घडली. शहरातील मध्यवर्ती भागात राहत असलेली १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी अभ्यास करण्याकरता तिच्या घराच्या टेरेस वरील खोलीत बसलेली असताना त्या खोलीमध्ये अजीम अर्शद खान हा घुसला. तेरे फोटो मेरे पास है, मैं तेरे फोटो दुसरे लडके के साथ जोडके तेरे बाप को दिखाउंगा असे म्हणून त्या मुलीचा हात धरून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले.



### कर्जतमध्ये पिस्टल बाळगणारा गजाआड

**कर्जत :** शहरातील दादा पाटील महाविद्यालयालगत असणाऱ्या प्रांगणात रात्री कमरेला पिस्टल लावून फिरणाऱ्या तरुणास पोलिसांनी अटक करत त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. विकास दत्तू सकट (वय २४, रा. टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी तपासणी केली तेव्हा त्याच्याकडून ३० हजार रुपये किमतीची एक लोखंडी पिस्टल, एक मॅक्झिन तसेच ६ हजार रुपये किमतीचे तीन जिवंत काडतुसे असा एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

### शेतकऱ्यांचा वाळू उपशाला विरोध

**आश्वी :** गेल्या सहा महिन्यांपासून शिबलापूर-माळेवाडी तसेच आश्वी खुर्द येथील शेतकऱ्यांनी वाळू उपसा करण्यास आणि डेपोला विरोध करूनही ठेकेदाराने प्रशासनाला हाताला धरून चक्क नदीपात्रात बोट उतरवली आहे. यामुळे येथील शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. मुळात प्रवरा नदीपात्रात गाळमीश्रित वाळू कुठेही आढळत नसल्याने महसूल विभागाने हा जावईशोध लावून डेपो मंजुरीसाठी शासकीय शब्दाचा दुरुपयोग करत चक्क नदी पात्रातील वाळू उचलण्याची परवानगी दिल्याचे प्रथमदर्शी निदर्शनास येत आहे.

### विस्थापितांचे तातडीने पुनर्वसन करा

**श्रीरामपूर :** शहरात गेल्या दहा दिवसांपासून चालू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत अनेक छोटे मोठे व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर आले आहेत. त्यांचे तातडीने शासकीय जागेवर पुनर्वसन करा, अशी मागणी आमदार हेमंत ओगले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत निश्चितच सकारात्मक निर्णय घेऊ, अशी ग्वाही दिल्याची माहिती आमदार हेमंत ओगले यांनी दिली.

# द्वारकानाथ नावाचा माझा 'शब्दनाथ' दूर आभाळी गेला !

- क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी माझे गुरु होते
- चित्रपट लेखक मोहन पडवळ यांचा आठवणींना उजाळा



**शिरुर : सतीश डोंगरे**

आज माझे गुरु गेले... शब्दांचे साम्राज्य पोरं झालं. आज मन उदास आहे... द्वारकानाथ नावाचा माझा 'शब्दनाथ' आज दूर आभाळी गेला, अशा शब्दांत कवठे येमाई (ता. शिरुर) येथील प्रसिध्द चित्रपट लेखक मोहन पडवळ यांनी क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना श्रध्दांजली अर्पण करीत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

लोकप्रिय क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचं गुरुवारी दीर्घ आजारानं निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. संझगिरी यांनी मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. पेशानं सिव्हिल इंजिनीयर असलेले संझगिरीमुंबईमहापालिकेत उच्च पदावर कार्यरत होते. पण क्रिकेट आणि मराठी साहित्यातल्या रुचीनं त्यांच्यातला क्रिकेट समीक्षक घडवला. मराठी क्रिकेटरसिकांनी त्यांच्या लिखाणाला नेहमीच पसंतीची दाद दिली.

सर, लिहीत रहा... माझा ऑक्सिजन आहे तुमचं लिखाण... अभिमानाने सांगतो आज मला 'ज्युनीयर द्वारकानाथ संझगिरी' म्हणतात. याचा अर्थ माझ्या लिखाणात तुमच्या लिखाणशैलीची कॉपी करतो असे नाही मात्र तुमच्या लिखाणशैलीची ब्रँडेड झलक नक्कीच असते. का नसणार, पुलं नंतर तुमचेच लिखाण संग्रही आहेत माझ्या. अगदी माझ्या नकळत्या वयापासून... असं ज्यावेळी मी त्यांना कळविले त्यावर त्यांची प्रतिक्रिया हृदयाच्या कप्प्यात जपून ठेवावी अशीच होती त्यावेळी ते म्हणाले होते मोहन पडवळ लिहित राहा, अशी वेळ येईल जेव्हा लोक मला ज्येष्ठ मोहन पडवळ म्हणतील, अशी आठवण आज मोहन पडवळ यांनी सांगितली.

आज माझे गुरु गेले...शब्दांचं साम्राज्य पोरकं झालं,माझ्या अगदी लहानपणी पेपरात कोणाला वाचायचो तर या माणसाला उपमा, अलंकार आणि शब्दसंपदेने नटलेले असायचं लिखाण. क्रिकेटचं रसभरित वर्णन करावं तर सरांनीच. सचिन, लारा, जयसूर्या, जॉन्टी, शेन वॉर्न या खेळाडुंना सरांनी त्यांच्या शैलीबद्ध शब्दात अक्षरशः आमच्या पिढीच्या हृदयात उतरवलं. नुसतच क्रिकेट नाही तर द्वारकानाथ संझगिरी हे चौफेर लिखाण करत ते माझ्यासोबत होते. आज ते गेल्याची बातमी कळाली आणि घरचं माणूस गेल्याची जाणीव झाली, असे पडवळ यांनी सांगितले.

आज मन उदास आहे...... द्वारकानाथ नावाचा माझा 'शब्दनाथ' आज दूर आभाळी गेला. सर वर जाऊन जरा इंद्र, चित्रगुप्त आणि यमा वर तुमच्या स्टाईलने लिहा... हा मोहन एका हाकेवर येईल तिथं येऊन वाचायला''

# जयहिंद पॉलिटेक्निकला क्रिकेटमध्ये उपविजेतेपद !

**रामचंद्र पॉलिटेक्निकचा ९ गडी राखून पराभव**



**नारायणगांव : प्रतिनिधी**

श्री.रामचंद्र पॉलीटेक्निक लोणीकंद येथे आय. इ. डी. एस. एस. ए. (डी-१ झोन) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेटच्या विभागीय स्पर्धेमध्ये जयहिंद पॉलिटेक्निकचा संघ उपविजेता ठरला.

अंतिम सामना झील पॉलिटेक्निक व जयहिंद पॉलिटेक्निक यांच्यात पार पडला यामध्ये झील पॉलिटेक्निक संघ विजयी ठरला. उपांत्यपुर्व फेरीमध्ये जयहिंदच्या संघाने रामचंद्र पॉलिटेक्निक लोणीकंद यांचा ९ गडी राखून पराभव केला. तसेच उपांत्य फेरीमध्ये सौ. वेणुताई चव्हाण पॉलिटेक्निक पुणे संघाचा १६ धावांनी पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना जयहिंद पॉलिटेक्निक व झील पॉलिटेक्निक यांच्यात झाला यामध्ये झील पॉलिटेक्निकने ८ गडी राखून विजय संपादन केला.

**अंतिम सामन्याचा धावफलक**

जयहिंद पॉलिटेक्निक (एकूण धावा ८८) मुजम शेख ३६(१७ चेंडू), आर्यन घोलप २३(२२ चेंडू) झील गोलंदाजी करताना प्रथमेश आवारे ३ षटकात १६ धावा, ओम सुतार २ षटकात १६ धावा, झील फलंदाजी (एकूण धावा ९०) - विजय ४६ (२० चेंडू) ओम सुतार २२ (१६ चेंडू) उपविजेत्या संघातील खेळाडूंना प्रा. मंगेश जाधव व हर्षल रणपिसे यांनी मार्गदर्शन केले. या विजयाबद्दल जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दतात्रय गल्हे, प्राचार्य डॉ. स्वप्निल पोखरकर यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

## वाचकांच्या लेखणीतून

# बांडगूळ

फावल्या वेळात शब्दांशी खेळणे मला आवडते. शब्द हा साहित्याचा मूळ घटक. मी साहित्यिक आणि पत्रकार असल्याने हा खेळ माझ्या पथ्यावरच पडतो.

बांडगूळ. जरा विचित्रच वाटतो हा शब्द. हा शब्द उच्चारताना वा लिहिताना आपल्या मनात नकारात्मक भावना तयार होते. असे का? जरा खोलात जाऊन विचार केल्यास याचे उत्तर सापडते.

वास्तवात बांडगूळ ही एक परपोषी, परजीवी वनस्पती आहे. तिला जिवंतिका किंवा बांदी असेही म्हणतात. संस्कृत भाषेत बांदी म्हणजे बंदिवान. हिंदी भाषेत दासी (वा लौंडी) असा अर्थ होतो. बंदिवान किंवा दासी हा परपोषी वर्ग आहे. कुणाचे बंदिवान वा दास होणे आपल्याला आवडणार नाही. यात नकारात्मकता आहे. बांडगुळाला जिवंतिका किंवा बांदी या उपमा शोभतात.

आंबा, वड, पिंपळ अशा झाडांच्या खोडांमध्ये किंवा फांदीवर ही वनस्पती वाढते. ज्या झाडावर बांडगूळ वाढते त्या झाडाला ते उपकारक असते. आंबा वा वडाच्या अन्नरसावर ही वनस्पती आपले पोषण करते. या वनस्पतीचा आकार बेढब असतो. कधी तो आपल्या कपाळावरील टेंगळासारखा वाटतो. तर कधी ही वनस्पती अन्य झाडाच्या फांद्यांवरही वाढते. या वनस्पतीला जाडसर हिरवी पाने फुटतात. लाल वा नारिंगी रंगाची फुलेही येतात. या वनस्पतीला वाटाण्याच्या आकाराएवढी फळेही येतात. त्यांच्यात चिकट द्रव असतो. ती फळे पक्षी खातात. काही काही वेळेला ती फळे चिकटपणामुळे पक्ष्यांच्या चोचीला चिकटून बसतात. अन्य फांदीवर किंवा झाडावर बसल्यावर पक्षी आपली चोच फांदी खोडावर



घासतो. ती बी तेथेच चिकटून बसते आणि रुजतेही.

बांडगूळ या वनस्पतीत औषधी गुणही आढळतात, असे कळते.

चल रे बांडगूळा. अरे जा जा बांडगुळा. बांडगुळाची औलाद. अशा शिव्यांतूनही या शब्दापाठचा नकारात्मक अर्थ लक्षात येतो.

बांडगूळ शब्दाचा नकारात्मक का असेना; पण मोठा काव्यात्मक अर्थ आहे त्याला! त्यामुळे आपल्या मराठी भाषेला एका अर्थपूर्ण भाव व्यक्त करणाऱ्या शब्दाचा लाभ झालेला आहे. खोटा सिक्का भी वक़्त पर काम आता है (खोटे नाणेही वेळेस कामी येते) असे म्हणतात. म्हणून तो आपण फुकाफुकी का दवडावा? शिवाय आपली मराठी ही अभिजात भाषा आहे, हे आता सिध्द आणि सरकारदरबारी मान्यही झाले आहे.

**नाना ढवळे,**
८२८९९१३२२३,
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# चार लाडक्या भावांनी उचलले लाडकी बहिण योजनेचे पैसे !

**नाव कमी करण्याच्या पत्रानंतर झाला उलगडा ; शासनाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई होणार**

**हिंगोली : प्रतिनिधी**

लाडक्या बहिण योजनेमधील कारनामे आता हळूहळू पुढे येऊ लागले असून हिंगोली जिल्हयातील चार लाडक्या भावांनीच लाडकी बहिण योजनेत नांव टाकून सहा हप्ते उचलले आहेत. विशेष म्हणजे कारवाईच्या भितीने या भावांनी दिलेल्या अर्जावरून हा उलगडा झाला आहे. आता या प्रकरणात शासनाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या सुत्रांनी सांगितले.

राज्यात शासनाने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना जाहिर केली होती. या योजनेमध्ये पात्र महिलांना १५०० रुपये महिना देण्याची घोषणा करून त्यांच्या बँक खात्यात पैसेही जमा होण्यास सुरवात झाली होती. त्यासाठी महिलांनी ऑनलाईन प्रस्ताव दाखल करून त्यांचे आधारकार्ड, बँक खाते क्रमांक तसेच छायाचित्र अपलोड




करण्यात आले होते.

दरम्यान, हिंगोली जिल्हयातून सुमारे ३.५० लाख महिलांनी लाडकी बहिण योजनेचे अर्ज दाखल केले होते. पंचायत समितीस्तरावरून सदर अर्ज मंजूर केल्यानंतर महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे. त्यानंतर शासनाने काही दिवसांपुर्वीच या योजनेचा लाभ बंद करण्याबाबत अर्ज देण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार हिंगोली जिल्हयातून आठ जणांनी लाभ बंद करण्याचा अर्ज दिला आहे. विशेष म्हणजे यामध्ये चार पुरुषांचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या संदर्भात महिला व बालविकास अधिकारी राजेश मगर यांनी सांगितले की, योजनाचा लाभ बंद करण्या संदर्भात आठ अर्ज प्राप्त झाले असून त्यामध्ये चार पुरुषांची नांवे असल्याचे दिसून आले आहे. त्यांनी आधारकार्डवर महिलांचे छायाचित्र लाऊन प्रस्ताव दाखल केला असावा. या चौघांच्या बँक खात्यावर सहा हप्ते जमा झाल्याचेही त्यांनी सांगितले. सदर चारही पुरुष औंढा नागनाथ तालुक्यातील असून महेश भांडे, रामराव काळे, गजानन काळे, शिवाजी भांडे अशी चौघांची नांवे असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणाची सखोल चौकशी सुरु करण्यात आली असून नेमकी नांवात चूक झाली आहे काय याची तपासणी करून त्यामध्ये सत्यता आढळून आल्यास शासनाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे मगर यांनी सांगितले.

पान १ वरून...

### ६ खासदार ठाकरेंची साथ सोडणार ?

ठाकरे गट फुटणार असल्याची चर्चा सुरु आहे. त्यामुळे ठाकरे गटातील नऊपैकी सहा खासदार लवकरच शिंदे गटात प्रवेश करतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. या सर्वांसाठी आता शिंदे गटांकडून ऑपरेशन टायगर करण्यात येणार आहे. दरम्यान आता या ऑपरेशन टायगर संदर्भात काही माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांनी टायगर ऑपरेशनची तयारी केल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचप्रमाणे यासाठी भाजपाच्या इतर वारिष्ट नेत्यांचाही पाठिंबा असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात उलाढाल होण्याचा चर्चा सुरु आहेत. ठाकरे गटातील पाच खासदार शिंदे गटात येण्याच्या तयारीत होते. मात्र उर्वरित एका खासदारचा निर्णय होत नव्हता. मात्र आता सहा खासदार शिंदे गटात येण्याची तयारी करत आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये ठाकरे गटाला २१ जागा लढवल्या होत्या. यामध्ये त्यांचे एकूण ९ खासदार निवडून आले होते. आता याच ९ खासदारांमधील ६ खासदार फुटणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे आता राजकारणाच्या रिंगणात कोणत्या हालचालींना वेग येणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

### सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती मिळवून देणार

सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नेमणूका देण्यासंदर्भात निर्णय देण्यात आला असल्याचेही खास. नीलेश लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे.

मालेगांव महानगरपालिकेमध्ये या नियुक्त्यांसंदर्भात कार्यवाही सुरू करण्यात आली असून कर्मचाऱ्यांना नेमणुका देण्यासही सुरूवात केली असल्याची माहीती असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात म्हटले आहे. दरम्यान याच प्रश्नावर मा. नगरसेवक दिप चव्हाण, अभिषेक कळमकर, योगीराज गाडे यांनीही या प्रश्नावर बैठकीत सविस्तर माहीती देऊन नियुक्ती देण्याची मागणी केली आहे.

मा. नगरसेवक दिप चव्हाण, अभिषेक कळमकर, योगीराज गाडे यांनी देखील बैठकीमध्ये सविस्तर माहिती देऊन नियुक्त्या देण्याबाबत मागणी केली.

### बिबट्या माणसांना मारू शकतो, मात्र बिबट्याला मारण्याची परवानगी नाही ?

खरा आकडा आपल्यासमोर येणार असल्याचे सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे. शिर्डीत विविध ठिकाणांवरुन आलेले आणि स्थायिक झालेले नागरिक तसेच खरे भक्त यांच्या आकडेवारीतील फरक आता समोर येणार असल्याचे देखील ते म्हणाले. शिर्डी संस्थानातील कर्मचाऱ्यांच्या ड्युटीवर बदल करण्यासंदर्भात त्यांनी वक्तव्य केले आहे. बदल करणे शक्य नसले तरी आगामी काळात कर्मचाऱ्यांसाठी बस सेवा सुरू केली जाऊ शकते का? याचा विचार करावा लागेल, असे देखील विखे पाटील यांनी म्हटले आहे.

### ऑपरेशन टायगरवर संजय राऊत काय म्हणाले ?

ऑपरेशन त्यांचे काय? माननीय मुख्यमंत्री फडणवीस हे रोज त्यांचे ऑपरेशन करत आहेत. रोज त्यांचा अपमान होत आहे. हा जो शिंदे गट आहे तो भारतीय जनता पक्षाच्या पोटात उगवलेला ॲपेंडीक्स आहे. आमचं ऑपरेशन करण्यापेक्षा तुमच्या ॲपेंडीक्सचं ऑपरेशन फडणवीस करत आहेत. त्याची तुम्ही काळजी घ्या.

### शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हा

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी जमा बंदी आयुक्त सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

नागपूर जिल्ह्यात प्रती किलोमिटर केवळ आठ ते दहा लाख रुपये खर्चामध्ये उत्कृष्ट पाणंद रस्ते बनविण्यात आले आहेत. या कार्यपद्धतीचा सर्व जिल्ह्यांनी अभ्यास करून इतर जिल्ह्यांमध्ये याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच ग्रामस्तरीय शेत रस्ता समिती स्थापन करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा. रस्त्यांचे काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. पाणंद रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.

### मी तोंड उघडले तर पंकजा मुंडेंचे मंत्रिपद जाईल !

टाका आणि राज्य करा. स्वतः तोंड उघडत नाही आणि माझ्या मुलाला उभे केले. माझा मुलगा फ्रस्टेशनमध्ये होता. आमचे काही बरे वाईट झाले तर हा माणूस स्वतःला माफ करु शकणार आहे का? बापाच्या सांगण्यावरुन त्याने स्टोरी टाकली. माझ्या मुलाला किती कॉल येत होते हे सर्वांनी बघितले आहे. ..तर पंकजा मुंडेंचेही मंत्रीपद जाईल : करुणा मुंडे म्हणाल्या की, तुम्ही मंत्री आहे, मी काही नाही.

मी वाईट महिला हे मान्य करते. अनेक मोठ्या गोष्टी आहेत. मी तोंड उघडले धनंजय मुंडेंचेच नाही तर तर पंकजाताईंचे पण मंत्रिपद जाऊ शकते, असा दावा त्यांनी केला आहे. धनंजय मुंडे मला रोडवर सोडू शकत नाही मी त्यांची बायको आहे, आता मला बोलायचे असेल तर कॅबिनेटमध्ये येऊन बोलणार.

**सीशिव मुंडेंची पोस्ट काय? :** मी सीशिव धनंजय मुंडे आहे आणि मला बोलणे महत्वाचे वाटते कारण मिडिया माझ्या कुटुंबाला मनोरंजनाचे साधन बनवत आहेत. माझे वडील कदाचित सर्वोत्कृष्ट नसतील, परंतु ते कधीही आमच्यासाठी हानिकारक नव्हते. तिने ज्या कौटुंबिक हिंसाचाराचा दावा केला आहे तो माझ्यावर, माझ्या बहिणीवर आणि माझ्या वडिलांवरही झाला आहे.

माझ्या आईने वडिलांना मारहाण केली तेव्हापासून ते निघून गेले आणि त्यानंतर माझ्या आईने मला आणि बहिणीला सोडून दिले आणि तेथून जाण्यास सांगितले.

कारण तिला आमच्याशी काही देणंघेणं नाही. २०२० पासून माझे वडील धनंजय हे माझी काळजी घेत आहेत आणि माझ्या आईला कोणत्याही आर्थिक समस्या नाहीत. माझी आई काही ना काही बहाने बनवत राहते. माझ्या आईने घरावरचं कर्ज सुद्धा फेडलेले नाही. आणि आता ती माझ्या वडिलांविरुद्ध सूडबुद्धीने लढण्यासाठी कथा रचत आहे.

# कामे करा अन्यथा खुर्च्या खाली करा !

## आ. काशिनाथ दाते यांचा शासकीय कर्मचाऱ्यांना इशारा

**शिरापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील महसूल, पोलीस विभागासह सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांना कामे करावीच लागतील. कोणत्याही कामामध्ये दिरंगाई न करता ताबडतो कामे माग लावव्या लागतील तसेच न झाल्यास खुर्च्या खाली कराव्या लागतील असा इशारा आमदार काशिनाथ दाते यांनी दिला.


शिरापुर येथील कानिफनाथ मंदिराच्या सभामंडपाचे भूमिपूजन आ.दाते यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. जि.प.चे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी बाबा महाराज खामकर, राहुल शिंदे, रखमाजी कापसे, सचिन वराळ, विजय औटी, वसंत चेडे, सुषमा रावडे, पंकज कारखिले, दत्ता पवार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.दाते म्हणाले, लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाल्याने गावोगावच्या विकास कामांना गती देऊन जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. जनतेने साथ दिल्याने आपण विकास कामांसाठी कोटयावधी रूपयांचा निधी खेचून आणणार आहोत. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण हे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा दूर करण्यासाठी सर्व योजनांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाल्याचे ते म्हणाले.

यावेळी डॉ.सचिन खामकर, संतोष सिनारे, आदिनाथ खामकर, शिवाजी पानमंद, दत्तात्रय पानमंद, भास्कर बेलकर, रामदास खामकर, मंगेश वाळुंज, पप्पू दाते, अंकुश थोरात यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### कामचुकारांच्या बदल्या करा !

*पोलीस व महसूल खात्यातील कर्मचारी सामान्यांच्या प्रश्नांना नेहमीच केराची टोपली दाखवितात. वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले तरच कामे करतात.त्याचा नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यासाठीही लोकप्रतिनिधींना फोन करावा लागतो हे दुर्देव आहे. अशा कामचुकारांच्या बदल्या करण्याची मागणी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे यांनी यावेळी केली.*



शिरापुर येथील सभामंडपाच्या भूमिपूजनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात आ. काशिनाथ दाते यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

### पोलीसांकडून चोराला सुटी व संन्याशाला फाशी !

*पारनेर पोलीस ठाण्यात चोराला सुटी तर संन्याशाला फाशी अशी स्थिती निर्माण झाली आहे. महसूल विभागात सामान्य माणसाला शिधापत्रिकेसाठी एक वर्षाचा कालावधी लागतो. हा विभाग दलालांचा बाजार झाला असून त्यास अधिकारी खतपाणी घालतात. त्यांच्या तात्काळ बदल्या करण्यात याव्यात.* – ***भास्कर उचाळे,*** *तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस*

# १५ व्या वित्त आयोगाच्या कामांत अपहार

## वडनेर हवेली येथील प्रकार ; ग्रामस्थांनी बीडीओंकडे तक्रार



**वडनेर हवेली येथे १५ व्या वित्त आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या कामांमध्ये अपहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. (छाया: शरद रसाळ)**

**सुपा : प्रतिनिधी**

तालुक्यातील वडनेर हवेली येथील ग्रामपंचायतीच्या वतीने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून राबविण्यात आलेल्या कामांमध्ये अपहार झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली असून या कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात गटविकास अधिकारी दयानंद पवार यांना निवेदन देण्यात आले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यात आलेली कामे अतिशय निकृष्ट पध्दतीची झालेली आहेत. या कामांची चौकशी व्हावी अशी ग्रामस्थांची मागणी असून चौकशी होऊन कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

वडनेर हवेली ग्रामपंचायतच्या माध्यमातून जुने शौचालय दुरूस्ती, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पिण्याच्या पाण्याची टाकी बांधकाम व दुरूस्ती, अंगणवाडी दुरूस्ती, स्मशानभुमीमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे, वैयक्तिक शौचालयाची कामे व वैयक्तिक शेळी पालन व विंधन विहीर आदी कामे करण्यात आली असून त्या कामांमध्ये मोठा अपहार झाल्याने ती निकृष्ट दर्जाची झाली आहेत, अनेक कामे अपुर्णावस्थेत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या कामांची चौकशी करण्यात यावी, एम.बी.च्या माध्यमातून असलेल्या निधीचे वाटप योग्य पध्दतीने झाले किंवा नाही ? याची चौकशी करण्यात यावी. निवेदनाचा गांभीर्याने विचार करून चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर सुनील बढे, अंकुश बढे, भाऊसाहेब भालेकर, विठ्ठल शिंदे, कारभारी भालेकर, सुधाकर भालेकर, सचिन बढे, संतोष राऊत, शामराव रेपाळे, भाऊसाहेब भालेकर यांच्या सह्या आहेत.

# आता बिबट्यांचा सामुहिक संचार !

## बंदोबस्त करण्याची भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी

**अळकुटी : प्रतिनिधी**

तालुक्यातील देसवडे, मांडवे, खडकवाडी, टाकळी ढोकेश्वर, कर्जुलेहर्या, पोखरी आदी गावांमध्ये बिबट्यांचा वावर मोठया प्रमाणात वाढला असून एक दोन नव्हे तर एकच वेळी १५ ते २० बिबट्यांचा सामुहिक संचार पहावयास मिळत असून वन विभागाने या बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने वन विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यात नमुद करण्यात आले आहे की, गेल्या काही दिवसांपासून बिबटे दिवसाढवळया पाळीव प्राण्यांसह माणसांवरही हल्ले करू लागले आहेत. नुकतेच खडकवाडी येथे चिमुकल्या शाळकरी मुलीवर बिबट्याने हल्ला करत तीचा बळी घेतला. देसवडे येथे सकाळच्या सुमारास योगेश गोळे या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला करून त्यास गंभीर जखमी केले. बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे व हल्ल्यांमुळे परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ भयभित झाले आहेत.

शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री शेततामध्ये पाणी भरण्यासाठी जाताना भिती वाटत आहे. देसवडे व इतर भागात १५ ते २० बिबटे समुहाने फिरताना दिसत आहेत. काही शेतकऱ्यांनी या बिबट्यांचा सामुहिक संचार पाहिलेला आहे. बिबट्यांच्या या दहशतीमुळे शेतांमधील उभी पीके सोडून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. बिबट्यांचा सामुहिक वावर पाहता त्यांचे हल्ले अधिक वाढण्याची भिती आहे. त्यामुळे त्यांना तातडीने जेरबंद करण्यात यावे अन्यथा तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांसह आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी बाळशिराम पायमोडे, संतोष वाबळे, मनोज तामखडे, अन्सार पटेल, अरूण बेलकर, प्रविण खोडदे, रघुनाथ मांडगे, राजू रोकडे, राहुल गुंड हे शेतकरी उपस्थित होते.



**तालुक्यातील वाढत्या बिबट्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीचे निवेदन भुमिपुत्र संघटनेच्या वतीने वन विभागाच्या उपवनसंरक्षकांना देण्यात आले.**

### या आहेत मागण्या

*तालुक्यातील अतिसंवेदनशील गावांना संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र घोषित करावे, बिबट्यांची वाढती संख्या पाहता बिबट नसबंदी करण्यात यावी, बिबट्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तिंना दहा लाख रूपयांची मदत मिळावी, स्वसंरक्षणासाठी बिबट्यांना मारण्याची परवानगी देण्यात यावी या मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.*

# कांस्यपदक पटकाविणाऱ्या सौरभचा सन्मान

## हिवरे बाजार परिवाराकडून कौतुक



**महाराष्ट्र केसरी स्पर्धेत कांस्य पदक पटकाविणाऱ्या सौरभ शिंदे याचा पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत नगर तालुक्यातील पिंपळगांव वाघा येथील सौरभ पोपट शिंदे यांने ७४ किलो वजनगटात कांस्यपदक पटविल्याबद्दल हिवरेबाजार परिवाराच्या वतीने त्याचा पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सौरभ याचे वडील पोपट शिंदे हे देखील त्यांच्या काळात कुस्ती क्षेत्रातील नामवंत मल्ल होते. या सत्कार समारंभास सरपंच विमल ठाणगे, सेवा संस्थेचे चेअरमन छबूराव ठाणगे, सेवा संस्थेचे व्हाईस चेअरमन रामभाउ चत्तर, मुंबादेवी सहकारी दुध उत्पादक संस्थेचे व्हा.चेअरमन बाबा गुंजाळ, हरिभाऊ ठाणगे, दामोदर ठाणगे, पैलवान पोपट शिंदे, पैलवान लक्ष्मण पवार, प्रसन्न पवार, सहदेव पवार, ग्रामविकास अधिकारी भास्कर सिनारे व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



**न्यायाधीश एन.एस.सबनीस यांनी अळकुटी शाळेस भेट देऊन संवाद साधला.**

# न्यायाधीशांच्या संवादाने चिमुकले भारावले !

## न्यायाधीश एन.एस.सबनीस यांची अळकुटी शाळेस भेट

**अळकुटी : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळतात का याची पाहणी करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पाहणी करण्यासाठी पारनेर न्यायालयाच्या त्रिसदस्यीय समितीने अळकुटी शाळेस भेट दिली. न्यायाधीशांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला त्यावेळी चिमुकले विद्यार्थी भारावून गेले.

विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भौतिक सुविधा तसेच शाळेत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहीती घेत न्यायाधीशांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. पहिल्यांदाच न्यायाधीशांनी शाळेस भेट दिल्याने भारवलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्ट दिसत होता.

शाळेतील वर्ग खोल्यांची पाहणी करत विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारत गुणवत्तेची तपासणी करण्यात आली. क्रीडा सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालय, वैद्यकिय कक्ष, प्रोजेक्टर, संगणक प्रयोगशाळा, परसबाग व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेची न्यायाधीशांनी पाहणी केली. शाळेतील पोषण आहार तसेच स्वयंपाक खोली याची पाहणी करून त्याच्या दर्जाबाबत न्यायाधीशांनी समाधान व्यक्त केले. शाळेच्या आवारातील विजेच्या तारा, अतिक्रमण, सी. सी.टी.व्ही कॅमेरे, स्वच्छता गृह सुविधा, क्रिडांगण याविषयी न्यायाधीशांनी तपशिलवार माहीती घेतली.

शाळेतील भौतिक सुविधांबद्दल तसेच सुंदर शालेय वातावरणाबाबत समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आनंदी व उत्साहीपणे शिक्षण घेऊन जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन करत न्यायाधीश सबनीस यांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


यावेळी केंद्र प्रमुख दौलत येवले, गणेश ढवळे, मुख्याध्यापक संजीवनी पावडे तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. न्यायाधीश सबनीस व समितीने केंद्रांतर्गत येणाऱ्या शेरी कासारे, गारखिंडी, कळस, पाडळीआळे, बहिरोबावाडी या शाळांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# निघोजला अखंड हरिनाम सप्ताह

## संत गोरोबाकाका मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन

निघोज, : श्री.संत गोरोबाकाका मुत प्राण प्रतिष्ठा वर्धापनदिनानिमित्त निघोज येथे अखंड हरिनाम सप्ताहास शुक्रवार दि.७ फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला.

दि.७ ते १३ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये नामवंत किर्तनकार हजेरी लावणार आहे. त्यात कैलास महाराज येवले, गणेश महाराज जगताप, बाळकृष्ण महाराज डांगे, पंडीत महाराज क्षिरसागर, चिदंबरेश्वर महाराज साखरे, भागवत महाराज साळूंके, संदीपण महाराज शिंदे यांचा समावेश आहे. दि.१४ रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान गुरूवर्य डॉ. नारायण महाराज जाधव यांच्या काल्याच्या किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ४८ वे वर्ष असून गेली अनेक वर्षे धार्मिक परंपरा जोपासण्यासाठी संत गोरोबा काका अखंड हरिनाम सप्ताह अखंडपणे सुरू आहे. गेल्या ४८ वर्षांपासून बन्सीबुवा श्रीमंदीलकर, नाथाबुवा खराडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गोरोबा काकांचे मंदिर बांधण्यासाठी तसेच अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यसाठी मोठे योगदान दिले आहे. या सप्ताहात निघोज ग्रामस्थांनी योगदान दिले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविकांनी सहभागी होऊन श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन संत गोरोबा काका अखंड हरिनाम सप्ताह मंडळ तसेच निघोज ग्रामस्थांनी केले आहे.



# खा. लंकेंच्या सुचनेनंतर पोखरीला बससेवा सुरू

**पोखरी : प्रतिनिधी**

खासदार नीलेश लंके यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या नगर विभागीय नियंत्रकांना नगर ते पोखरी बस सेवा सुरू करण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या पत्राची दखल घेऊन नगर ते पोखरी बस सेवा सुरू करण्यात आली असून ही सेवा सुरू झाल्याने पोखरी व परिसरातील ग्रामस्थांनी खा. नीलेश लंके यांच्याप्रती ऋण व्यक्त केले आहे.

नगर ते पोखरी ही बस सेवा अनेक वर्षे सुरू होती. त्यामुळे पोखरी व परीसरातील प्रवाशांची मोठी सोय होत होती. मध्यंतरी ही बस सेवा बंद झाल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत होते. पोखरी परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, कष्टकरी यांच्यासाठी ही बससेवा अतिशय सुलभ होती. बस सेवा बंद झाल्याने या भागातील प्रवाशांना प्रवासासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अवैध वाहतूकीचा मार्ग नाईलाजाने स्विकारावा लागतो. ते टाळण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने नगर ते पोखरी ही बस सेवा सुरू करण्यासंदर्भात नगर विभागाच्या विभाग नियंत्रकांना खा. लंके यांनी पत्र दिले होते. खा. नीलेश लंके यांच्या नगर येथील संपर्क कार्यालयातील स्वीय सहाय्यक संतोष हांडे यांनी या प्रकरणी विभाग नियंत्रकांकडे पाठपुरावा केला होता.

दरम्यान, बस सेवा सुरू झाल्यामुळे पोखरी व परिसरातील प्रवाशांनी आनंद व्यक्त केला. बसचे पोखरी गावामध्ये आगमन झाल्यानंतर जल्लोषात स्वागत करण्यात आले. पहिल्यांना बस घेऊन आलेल्या चालक तसेच वाहकांचा यथोचित सन्मान करण्यात येऊन त्यांना सर्वतापरी सहकार्य करण्याची ग्वाही पोखरी व परिसरातील प्रवाशांच्या वतीने देण्यात आली.

# सुप्यातील शाळांचे जल्लोषात स्नेहसंमेलन

## सरपंच मनिषा रोकडे व सदस्यांचे सहकार्य

**सुपा : प्रतिनिधी**

सुप्यातील जिल्हा परिषदेच्या पवारवाडी, खडकवाडी व डोंगरवाडी येथील शाळांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सरपंच मनिषा योगेश रोकडे व ग्रामपंचायत सदस्यांच्या सहकार्याने आयोजित स्नेहसंमेलन जल्लोषात साजरे झाले. शरद पवार, सचिन पवार व हेमलता पवार यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून प्रारंभ करण्यात आल्या. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षक बँकेचे मा. चेअरमन गोकुळ कळमकर यांनी जिल्हा परिषद शाळांचे कौतुक करत उपस्थितांना सर्व उपक्रम, गुणवत्ता आणि दर्जा खाजगी शाळांपेक्षाही चांगला असल्याचे अभिमानाने सांगितले. विस्तार अधिकारी के.आर. ढवळे यांनी सुपा परिसरातील शाळांना ग्रामपंचायतीच्या वतीने सहकार्य करण्यात येते याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्याविष्कार, विनोदी नृत्य तसेच लोककला जपणारी वैविध्यपुर्ण कलाकृतींनी उपस्थितांची वाहवा मिळविली. यावेळी शिक्षणाधिकारी अशोक कडूस विलास पवार, प्रिती शिंदे, उपसरपंच इम्रान शेख, बँकेचे संचालक कारभारी बाबर, सुर्यकांत काळे, दादाभाऊ कोल्हे आदी उपस्थित होते.



**सुपा येथील जिल्हा परिषद शाळांचे स्नेहसंमेलन जल्लोषात साजरे झाले.**

### सामाजिक बांधिलकीचा वसा

*आपल्या गावातील शाळांमध्ये भौतिक सुविधा देऊन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले तरच गावाचा विकास झाला असे म्हणता येईल. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांना वैयक्तिक तसेच लोकसहभागातून संपन्न करताना सामाजिक वारसा जपण्याचा आम्ही वसा घेतला आहे.*

– ***मनिषा रोकडे,*** *सरपंच, सुपा*

### रोकडे दाम्पत्याविषयी ऋण

*शाळांच्या आवारात पेव्हींग ब्लॉक, स्मार्ट बोर्ड, टी व्ही , सोलर सिस्टम, सी.सी. टी. व्ही, डिजीटल वर्ग आदी भौतिक सुविधा देण्यात आल्या असून शाळांच्या स्नेहसंमेलनास आवष्यक स्टेज, सिस्टम, विद्युत रोषणाई, तसेच आवष्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच मनिषा रोकडे तसेच उद्योजक योगेश रोकडे हे सर्वतोपरी मदत करत असल्याबद्दल शिक्षकांनी ऋण व्यक्त केले.*

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com